ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारतातील ग्रामीण स्वच्छता आणि आरोग्य

**प्रा. डॉ. गांधी हरिभाऊ बानायत**
*समाजशास्त्र विभाग प्रमुख*
*शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड*

***सारांश :-***
*ग्रामीण भागातील अस्वच्छता हेच रोगराईचे प्रमुख कारण आहे अस्वच्छता मग ती सार्वजनिक असो की व्यक्तिगत ती हानिकारकच आहे. घराची गावाची व परिसराची स्वच्छता व्हावी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेस स्वच्छतेतून समृद्धीकडे ही संकल्पना मूर्त स्वरूपात यावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्वच्छतेची सुरुवात संत गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी समाजाला करून दिलेली आहे. त्यांचा स्वच्छतेचा वारसा आपण चालवणे आवश्यक आहे*

प्रस्तावना :-

भारतीय समाज जीवनाचा विचार करता चातुर्य वर्णव्यवस्थेवर आधारित जातिव्यवस्थेने लाभलेल्या विविध प्रकारच्या निर्बंधामुळे भारतीय समाजातील मोठा घटक विकासापासून वंचित राहत आलेला आहे. भारतीय समाज व्यवस्थेचा मुख्य आधार खेडे आहे. त्यामुळे विकासाची गंगा खेड्यापर्यंत पोहोचली पाहिजे. खेड्यामध्ये स्वच्छता आरोग्य या प्रकारच्या सुविधा गेल्या पाहिजेत तेव्हाच देशाचा विकास शक्य आहे. लोकशाही प्रदान देशात समाजाचा सर्वांगी विकास हा कोणत्याही कल्याणकारी राज्याचा उद्देश असतो. भारतीय समाजातील दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय आपले समाजवादी समाज रचना प्रस्थापित करण्याचे उद्दिष्टे साध्य होणार नाही.

**स्वच्छता आणि आरोग्य**

आरोग्य संपन्न किंवा निरोगी पर्यावरणीय परिस्थिती निर्माण करण्याची कृती किंवा प्रक्रिया म्हणजे सार्वजनिक स्वच्छता होय. आरोग्य म्हणजे समाजाच्या किंवा एकूण लोकसंख्येच्या आरोग्याची अवस्था होय. लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे त्याची गुणवत्ता वाढवणे व ते सुधारणे यासाठी समाजाने संघटित केलेल्या प्रयत्नांना सार्वजनिक आरोग्य म्हणतात. सार्वजनिक आरोग्य विषयक कार्यक्रम व सेवा आणि त्यात कार्यरत असलेल्या संस्था याद्वारे रोगाचा प्रतिबंध करणे समग्र लोकसंख्येच्या आरोग्य विषयक गरजा भागवणे त्यांच्यावर भर देणे, रोगाचे प्रमाण, अकाली मृत्यू शारीरिक दुर्बलता, अस्वास्थ, कुपोषण इत्यादी कमी करणे हे सार्वजनिक आरोग्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. ग्रामीण समाजातील स्वच्छतेच्या समस्येचा अभ्यास करणे.
२. ग्रामीण लोकांच्या आरोग्यामध्ये झालेले परिवर्तन अभ्यासणे.
३. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे यश अपयश अभ्यासणे.
४. स्वच्छ भारत अभियान आणि शौचालयाची सत्यता तपासणे.

**संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड केलेली आहे. तथ्य सामग्रीच्या संकलनासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, पुस्तके शोध पत्रिका, नियतकालिके, वर्तमानपत्रे तसेच प्रकाशित, अप्रकाशित साहित्य व इंटरनेटचा आधार घेतलेला आहे.

**सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता**

समाजाला स्वच्छता आणि आरोग्याचा संदेश देणारे थोर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेतून स्वच्छता आणि आरोग्याचा मंत्र दिलेला आहे. त्याचप्रमाणे स्वतः हातात खराटा घेऊन दिवसा गाव स्वच्छ करणे आणि रात्री कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील घाण स्वच्छ करण्याचे कार्य करणारे संत गाडगे महाराज होय परिसर स्वच्छ असला तर व्यक्तीचे विचार शुद्ध होतात अशी शिकवण त्यांच्या विचारातून मिळते.

अस्वच्छतेमुळे अनेक रोग उद्भवतात लहान मुलांना विशिष्ट रोगापासून संरक्षण देण्यासाठी प्रतिबंधक लस टोचण्याची व्यवस्था आरोग्य यंत्रणेमार्फत केले जाते जसे देवी, पोलिओ, डांग्या खोकला, धनुर्वात, क्षय, घटसर्प यांच्याविरुद्ध प्रतिबंधात उपाय म्हणून लस टोचण्याची व्यवस्था स्थानिक आरोग्य संस्थेमार्फत केली जाते. अन्न पाणी, हवा यांच्यामार्फत अनेक रोगजंतू शरीरात प्रवेश करतात

काही रोग संसर्गजन्य तर काही रोगवाहकांमार्फत पसरतात, म्हणून अन्नदिकाच्या शुद्धतेकडे सार्वजनिक आरोग्य खात्याला सतत लक्ष द्यावे लागते 2019 मध्ये कोरोना या संसर्गजन्य रोगांमुळे कित्येक लोक मरण पावले आहेत. यासाठी प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे तसेच आरोग्य संपन्नतेसाठी स्वच्छता आवश्यक आहे.

**स्वच्छता आणि शौचालय**

आमच्या संस्कृतीत अहिंसासत्यमस्तेनं शौचंमिद्रिय निग्रहः। एतत सामासिको धर्म सर्व वर्ण प्रक्रीर्तितः। या सर्वांना आवश्यक अशा सामाजिक धर्मात शौच म्हणजे सूचीभूर्तपणा स्वच्छता पावित्रे या महामुल्यांचा अंतर्भाव केलेला आहे. आपल्या सवयीचा आपल्या आरोग्यावर, गावावर व एकंदरीत आपल्या व्यक्तिगत व सामाजिक भवितव्यावर किती गंभीर परिणाम होईल याची जाणीवही बहुसंख्य लोकांना नाही. मग या सवयी दुरुस्त करण्याची भावना वा बुद्धी फारशी आढळत नाही.

इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये एक पाठ होता भारत माझा देश आहे. या पाठांमध्ये लेखकाने आपले गाव जवळ आले कसे ओळखायचे तर एक समर्पक उदाहरण म्हणून नाकाला रुमाल लावावा लागला की समजावे गाव जवळआपले. या वाक्यातून लेखकांना स्वच्छतेचा विरोधाभास दाखवून द्यायचा आहे.

ग्रामीण भागातील अनेक खेड्यामध्ये 21 व्या शतकात आजही शौचालयाची व्यवस्था नाही. स्त्रियांना लहान मुलांना वृद्धांना रात्री शौचालयास जावे लागते. त्यांना कोणतीही सुरक्षित असते. ग्रामीण भागातील स्वच्छतेची स्थिती पाहता संत गाडगेबाबा आपल्या कृतीतून दाखवून देतात. तर संत तुकडोजी महाराज ग्रामगीतेतून उपदेश करतात. रमेश जयराम यांनी निर्मल भारत यात्रेच्या निमित्ताने असे म्हटले की देशातील मंदिरापेक्षा शौचालय पवित्र आहेत. भारतीय समाज देवी देवता च्या पूजनासाठी प्रसिद्ध आहे. भारतीय देव देवता साठी असंख्य मंदिर आहेत, पण महिलासाठी घरात एक शौचालय नाही. मंदिरापेक्षाही पवित्र शौचालय बनविण्यासाठी ही निर्मळ यात्रा आहे. श्रद्धेपोटी लाखो रुपये खर्च करून मंदिरे उभारले जातात जर महापुरुषाने महात्मा गांधी, फुले, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाळा बांधण्या ऐवजी देवळे बांधली असती तर बहुसंख्य समाजाची आज काय अवस्था राहिली असती त्यांना शिक्षण आरोग्य मिळाले नसते.

संत गाडगेबाबा च्या दृष्टीने प्रत्येक माणूस सुखी असला पाहिजे जनहेची जनार्दन या दृष्टीने प्रत्येक व्यक्ती आरोग्य संपन्न असला पाहिजे एके ठिकाणी तुकडोजी महाराज म्हणतात शौचालय ज्याचे घरी आरोग्य तेथे वास करी.

*नदी किनारी व बोरंगात। शौचासिजाती स्त्रियादी समस्त।*
*ती कुचंबना आणि घाण निश्चित। दूर होई चरसंडासे।*

अशाप्रकारे संत तुकडोजी महाराजांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिलेला आहे.

**स्वच्छ भारत मिशन अभियान**

महात्मा गांधी यांची 145 जयंती निमित्त माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन आक्टोंबर 2014 ला राजपथावर स्वच्छ भारत अभियान याची सुरुवात करण्यात आली. महात्मा गांधीच्या 150 व्या जयंती पर्यंत संपूर्ण भारत स्वच्छ व्हायला हवा असा विश्वास त्या ठिकाणी व्यक्त करण्यात आला. स्वच्छ भारत अभियानासाठी 1.96 लाख कोटी रुपयाची गुंतवणूक करून 1.2 कोटी शौचालय बांधण्यात आली. सन २०१७-१८ च्या पायाभूत सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रामध्ये खालील **प्रमाणे शौचालय बांधण्यात आली**.

| एकूण कुटुंबे | शौचालय असलेली कुटुंबे | शौचालय नसलेली कुटुंबे |
|---|---|---|
| 11153486 | 10362744 | 790742 |

**सामूहिक शौचालय वापरणाऱ्या कुटुंबाची संख्या दर्शवणारा तक्ता**

| एकूण कुटुंब | सामूहिक वापर | अन्य |
|---|---|---|
| 44186 | 130551 | 174737 |

**महाराष्ट्रातील हागणदारी मुक्त ग्रामपंचायतची स्थिती**

| एकूण गावे | हागणदारी मुक्त गावे | शिल्लक |
|---|---|---|
| 40519 | 30676 | 9841 |

**निष्कर्ष**

स्वच्छता आणि आरोग्य ही आयुष्याची गुरुकिल्ली आहे. गावातील सामूहिक स्वच्छतेमुळे आरोग्यात परिवर्तन झाले आहे. लोकांमध्ये स्वच्छतेची संस्कृती रुजली आहे. ग्रामस्वच्छता अभियान यशस्वी करत असताना विविध जाती धर्मातील लोकांनी मतभेद विसरून अभियाना सहकार्य केले आहे. समाजामध्ये स्वच्छते विषयी जाणीव जागृती निर्माण झाली आहे. शासकीय योजना राबविताना सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून भारत देश स्वच्छतेतून समृद्धीकडे हा मंत्र प्रत्येक्षात समाजामध्ये रुजला आहे.

**संदर्भ :-**

१. जोशी लक्ष्मण शास्त्री-1983 ''मराठी विश्वकोश'' खंड 2 महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई.

२. भारदे बाळासाहेब- 2003, ग्राम क्रांतीच्या दिशा महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे 38.

३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 2004 ग्रामगीता मूळ संपादक सावरकर सुदामजी आढळ चंद्रपूर.

४. कैंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील आव्हान दिनांक 27/11/ 2017.

५. महात्मा गांधी 1997 माझ्या स्वप्नातील ग्रामीण भारत मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिति नांदेड-2.